

# चहा, भाजीचा व्यापार!

(भाग ३)

### ती शोभायात्रा

त्या दिवशी पिंपुटकर जेवायला बाहेर घेऊन गेला. नानाला भेटायला पाहिजे होतं.

पण भेटून काय सांगणार? दहा रुपये असल्याशिवाय त्याला भेटायचं कसं? दोन-तीन दिवस गेले आणि एका संध्याकाळी नानाच अचानक आमच्या खोलीत आला. म्हणाला, "राम, जरा खाली ये." मी मुकाट्यानं खाली गेलो. त्यानं दहा रुपयांची मागणी केली. मी त्याला बडोदा, अहमदाबादची सारी कहाणी सांगितली. पण तो काही ऐकायला तयार नव्हता. त्याचं म्हणणं, 'ताबडतोब दहा रुपये दे, नाहीतर माझ्याकडे राहायला चल. मी तुझा सख्खा मोठा भाऊ इथं जिवंत असताना असल्या हालात का दिवस काढतोस? माझ्याकडे चल. मी तुझं सगळं करीन.'

मी त्याला सांगत होतो की, "केव्हातरी तुझे दहा रुपये परत करीन, पण तुझ्याकडे राहायला येणार नाही." तो ते ऐकायला तयार नव्हता. त्याला दहा रुपये नको होते, तर त्याची इच्छा माझी या सगळ्या हालातून सुटका व्हावी, अशी होती. काहीही झालं तरी मला असल्या दीनवाण्या अवस्थेत राहू द्यायचं नाही, असा त्यानं निश्चय केला होता आणि मी काहीही झालं तरी त्याच्याकडे राहायला जाणार नव्हतो. "तू आम्हांला मेलास आणि आम्ही तुला मेलो. दादा, नाना, मिरज, जमखंडी, कोल्हापूर सारं तुला यापुढं बंद-" हे उद्‌गार धाकट्या मामांनी ज्या परिस्थितीत काढले, त्या परिस्थितीत त्यांनी काढलेलं अनुमान स्वाभाविकच होतं. त्यांचा हेतू चांगलाच होता. पण हे उद्‌गार माझ्या काळजात घुसलेले होते. या सर्वांचं मतपरिवर्तन होईल, तेव्हाच त्यांच्याकडे जाईन, हा माझा निश्चय होता. बडोद्याला मिळू शकणाऱ्या संभाव्य पैशांच्या मोहामुळे मी नानाकडे दहा रुपये मागितले, ही माझी चूक होती. पण त्यामागं एक सुप्त विचार होता. बडोद्याला शे-दीडशे रुपये मिळाले असते, तर त्या पैशात जीवनाची घडी पुन्हा नीट बसविण्याचा प्रयत्न सुरू करता आला असता. नानाचे दहा रुपये देता आले असतेच, पण काही दिवसांनी – वर्षादोन वर्षांनी का होईना - मामांचे आणि दादाचे दोनशे रुपये परत करता आले असते. म्हणून मी लाचार होऊन नानाकडून पैसे घेतले.

आता मला काहीही करून आपल्या घरी घेऊन जाण्याच्या निश्चयानंच तो माझ्याकडे आला होता. मी दहा रुपये देऊ शकत नाही, हे चांगलं कारण त्याला मिळालं होतं. त्याचं माझ्यावर अतिशय प्रेम होतं. माझे हाल त्याला बघवत नव्हते. त्याला मिळणाऱ्या चाळीस रुपयांत तो मलाही समाधानानं जगवणार होता. मी ऐकत नाही, हे पाहून त्यानं माझ्या बकोटीला धरलं आणि मला ओढून आपल्या घरी नेऊ लागला. मी 'येणार नाही - येणार नाही' म्हणून ओरडत होतो आणि तो मला रस्त्यातून फरफटत नेत होता. संध्याकाळच्या वेळी माणसांनी फुलून गेलेल्या गिरगाव रोडवरून आमची ही शोभायात्रा चालली होती.

नानानं त्याच्याकडे मला नेलं. हा सगळा ताण मला इतका असह्य झाला की, मी बेशुद्ध होऊन पडलो. किती वेळ बेशुद्ध होतो, मला माहीत नाही, पण शुद्धीवर आलो, तेव्हा नाना रडत होता. सारखं म्हणत होता, "राम, तुझं चांगलं करावं, म्हणून मी हे सगळं केलं. मला पैसे नको होते. तू हवा होतास. जा, तुला वाटेल त्या ठिकाणी राहा, पण सुखात राहा." त्यानं मला रायकरच्या खोलीत पोचवलं. नानानं रायकरला माझी

काळजी घ्यायला सांगितली आणि तो निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. पेटी घेतली. रायकरला म्हटलं, "तुझ्या कविता काढ. चाली लावता येतात का, ते पाहतो." त्यानं बऱ्याच कविता दाखवल्या. त्यांतली एक निवडली. बघता बघता ती कविता स्वरात बोलू लागली. 'विजयश्री ये घेऊन, जा पुढे, नको मागुती पाहू परतून." अगदी अर्थानुरूप चाल लागली. रायकर खूष झाला. पुढं कालांतरानं संघाच्या सर्व शाखांत महाराष्ट्रभर ती कविता लोकप्रिय झाली. प्रत्येक शाखेत गायली जाऊ लागली.

दोन दिवस त्या स्वरांच्या मस्तीतच गेले. या अवधीत पिंपुटकरनं एक प्रचंड विनोद केला. खोलीच्या बाहेर त्यानं एक पाटी लावली 'वर्ल्डवाइड पब्लिसिटी ब्यूरो.'

ते नाव वाचून आम्ही मनमुराद हसलो. तो खोलीत राहायला आल्यापासून काही उद्योगाच्या खटपटीत होता. निरनिराळ्या वर्तमानपत्रांना जाहिराती मिळवून देण्याचा उद्योग त्यानं सुरू केला होता. मी त्या खोलीत होतो, तोपर्यंत तरी त्या उद्योगात त्याला महिन्याला मोठ्या शिकस्तीनं पंधरा-वीस रुपये सुटत असावेत. त्याचं 'वर्ल्ड' गिरगावच्या बाहेर फारसं 'वाइड' झालंच नाही! पैसे किती मिळतात, ते बाजूला ठेवलं, तरी तो मोठा आनंदी आणि तसाच उद्योगी माणूस होता.

रायकरच्या कवितेला चाल लावल्यावर रायकर म्हणाला, "सुधीर, तू असं का करीत नाहीस? या आपल्या खोलीच्या बाहेर तुझीही एक पाटी लाव, गायनक्लासची. - नाव काढू काहीतरी झकास." मी म्हटलं, "नाव तयार आहे - 'कलाकेतन'. या नावानं मी कोल्हापुरात क्लास काढला होता. तेच पुन्हा चालू करू."

रायकर म्हणाला, "केतन नको, निकेतन कर."

माझी काहीच हरकत नव्हती. रायकरकडे एक जुनी पाटी पडलेली होती. ती त्यानंच रंगवून आणली, लावली आणि तिला हार घातला. २१७ क्राऊन बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावरील रायकरच्या खोलीबाहेर आता तीन पाट्या लागल्या. 'डॉ. वैद्यकुमार रायकर यांचे आर्य चिकित्सामंदिर', 'वर्ल्डवाइड पब्लिसिटी ब्यूरो' आणि 'कलानिकेतन चालक सुधीर फडके.'

रायकरची प्रॅक्टिस त्याच्या दृष्टीनं समाधानकारक होती. पिंपुटकरची 'वर्ल्डवाइड पब्लिसिटी ब्यूरो' या प्रचंड नावाची संस्था महिन्याला पंधरा-वीस पंचवीस रुपये कशीबशी मिळवी. मला मात्र हे भाग्य कधीच लाभलं नाही. माझी पाटी पाहून रायकरचे मित्रमैत्रिणी आणि इतर काही कलावंत मंडळी जमायची. गाण्याच्या मैफली व्हायच्या, पण शिकायची किंवा पैसे द्यायची भाषा कुणीच करायचे नाहीत. त्यामुळे दोन पैशाचे तांदूळ आणि आमटी, दह्यासाठी पैसा पैसा देणं आता अशक्य होऊ लागलं. रायकरनं आणि पिंपुटकरनं काही वेळा सांभाळून घेतलं, पण यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा होता.

**चहाचा व्यापार**

विचार करून करून मी शेवटी 'चहाचा धंदा' करायचं ठरवलं. त्याची बारीकसारीक चौकशी केली. त्या धंद्यात फायदा बराच असतो. चहाचा व्यापार करायचं ठरविल्यावर माझा मित्र यशवंत केदारे याच्याकडे गेलो. त्यानं माझी योजना ऐकून घेतली आणि दहा रुपये भांडवल म्हणून दिले. दहा रुपयांचा वेगवेगळ्या प्रकारचा चहा खरेदी करायचा, त्यांचं मिक्स्चर तयार करायचं आणि घरोघरी जाऊन विकायचं. रोज जे पैसे जमा होतील, ते केदारेकडे द्यायचे. भांडवलासाठी काही भाग काढून घेऊन उरलेले त्यानं मला द्यायचे, असा व्यवहार ठरला.

मी चहाच्या घाऊक व्यापाऱ्यांकडे जाऊन ऑरेंज पिको, ब्रोकन पिको, पिको सुचांग आणि डस्ट असा चार प्रकारचा चहा घेऊन आलो. दोन दिवस ही वेगवेगळ्या प्रमाणात चहाची पूड मिसळून कोणत्या मिश्रणाची चव चांगली लागते, त्याचे प्रयोग केले. या बाबतीत पिंपुटकर मदत करीत होता. शेवटी एक मिक्स्चर ठरलं. कागदाच्या पुड्या आणल्या आणि अर्ध्या रत्तलाचे पुडे भरले.

दुसऱ्या दिवशी मग सकाळपासून चाळीत पायपीट सुरू. व्यापाराची काहीच माहिती नव्हती. पण अशा कल्पनेत होतो की, दोन-चार दिवसांत हा सारा चहा खपेल. मग फायद्याचे पैसे भांडवलात घालून दहाच्या ठिकाणी पंधरा रुपयांचा चहा आणू. मग थोड्या दिवसांनी वीस रुपयांचा. मग तीस. मग पन्नास. शंभर रुपयांपर्यंत आपली खरेदी गेली की, महिन्याला चाळीस-पन्नास रुपये सहज सुटतील!

पण पहिल्याच गिऱ्हाइकानं दणका दिला. ते म्हणाले, "आमचं नेहमीचं मिक्स्चर ठरलेलं आहे. आम्ही वाण्याकडे यादी नेऊन टाकतो. तो माल आणून टाकतो. पैसे आम्ही सावकाश देतो. चहाची चवही आमची ठरलेली आहे. तुमचा चहा आमच्या आवडत्या नेहमीच्या चवीचा किंवा त्यापेक्षा चांगला आहे की कसा, ते आम्हांला पाहावं लागेल. तुम्ही पाव पुडा ठेवून जा. आम्ही वापरून बघू. आवडला तर तुमच्याकडून घेऊ, पण पैसे मात्र पुढच्या महिन्यात पगारानंतर मिळतील."

मी मुकाट्यानं पुढच्या खोलीत गेलो. अशा प्रकारचा व्यवहार मला परवडण्यासारखा नव्हता. हे असलं काही असतं, हे आधी डोक्यातच आलेलं नव्हतं. मोठ्या मुष्किलीनं पंधरावीस दिवसांत सारा चहा खपवला. त्यावेळी चहाचा भाव सहा आणे, आठ आणे, फार तर दहा-बारा आणे रत्तल होता. सगळा चहा संपल्यावर हिशोब केला, तेव्हा अडीच रुपये फायदा झाला होता! पायपीट आणि तोंडपीट जबरदस्त झाली होती. हा धंदा तसा चांगला आहे. खरोखरीच भरपूर फायदा या चहाच्या धंद्यात आहे, पण त्याला भांडवलही भरपूर पाहिजे. चहाच्या पेट्या खरेदी करून सुटा चहा मिश्रण करून विकला तर फायद्याचं प्रमाण खूप असतं. दहा रुपयांत झाला, तो फायदाही तसा चांगलाच होता. पण जास्त भांडवल मिळणं शक्य नव्हतं, त्याचप्रमाणं उधारी ठेवणं अशक्य होतं. त्यामुळे दहा रुपये परत मिळताच हा धंदा बंद केला.

चहाविक्रीच्या पहिल्या चार-पाच दिवसांतच एका दुसऱ्या धंद्याची कल्पना मनात

येत होती. तो म्हणजे भाजीविक्रीचा. भाजी प्रत्येकाला रोज आणावी लागतेच. आणि तीही रोख पैसे मोजून. त्यामुळे त्या धंद्यात उधारीचा प्रश्न नव्हता. त्या धंद्याची चौकशी चहा विकता विकताच करीत होतो. आधीच काही लोकांशी बोलून ठेवलं होतं. त्यामुळे गिऱ्हाईकं तयार होती. चहाचा धंदा बंद करून आता भाजीचा सुरू केला.

पहाटे तीन वाजता उठलो. ट्रॅम सुरू झाली नव्हती. म्हणून चालतच भायखळ्याच्या भाजी मार्केटमध्ये गेलो. तिथं पहाटेपूर्वीच ट्रक भरभरून भाजी येते. तिथं घाऊक भाजी खरेदी केली, तोपर्यंत ट्रॅम सुरू झाली होती. पालेभाजीच्या निरनिराळ्या जुड्या केल्या. चहाच्या व्यापारासाठी एक जुनी तागडी पिंपुटकरनं घेऊन दिली होती. त्या तागडीचा उपयोग वांगी, कोबी, फ्लॉवर वगैरे तोलण्यासाठी झाला. दोन मोठ्या पिशव्या घेऊन पुन्हा चाळीचाळींत माझा मोर्चा निघाला. हा धंदा तसा लाभदायक होता. यातच पुढे सातत्यानं राहिलो असतो, तर कदाचित पुढं भाज्यांचा मोठा ठेकेदार झालो असतो. पण सात-आठ दिवसांतच हा बरे पैसे मिळवून देणारा धंदा सोडून द्यावा लागला. यातले श्रम झेपेनात. पहाटे तीन वाजता उठायचं, चालत भायखळ्याला जायचं, भाज्यांचं मोठं ओझं घेऊन यायचं आणि पुन्हा चाळींचे असंख्य जिने चढायचे. सात-आठ दिवसांतच माझी सगळी शक्ती नाहीशी झाली. आमचं खाणं म्हणजे फक्त भातआमटी आणि सकाळ-दुपार चहा. बस्स! हे खाणं आणि असले श्रम याचं प्रमाण शरीराला मानवलं नाही. पाय मोडून गेले. काही उचलायला हातांत त्राणच उरलं नाही. आणि अशा तऱ्हेनं चहाच्या आणि भाजीच्या मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या नामावळीत पुढं मागं मोठ्या दिमाखानं झळकू लागण्याची शक्यता असलेलं 'सुधीरशेठ' किंवा 'फडकेशेठ' हे नाव परिस्थितीच्या गटांगळ्यांत नाकातोंडात पाणी शिरूनही कसाबसा जीव जगण्याच्या केविलवाण्या धडपडीत होतं तसंच राहिलं!

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)